MHAU090002632024

**म.कौ.हिं.सं.का. अर्ज क्र. ०८/२०२४**

**निशाणी ०५ खालील आदेश**

**(माया व ई वि.अविनाश व ई.)**

**१.** प्रस्तुतच्या अर्जाद्वारे अर्जदार क्र.१ हीने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ अन्वये स्वतःसाठी व अर्जदार क्र.२ साठी दरमहा १०,०००/- अंतरीम पोटगी देण्याची विनंती केली आहे.

**२.** अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याची पत्नी असून त्यांचा विवाह बौध्द धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे दिनांक १७.०४.२०२२ रोजी झाला असून आजदेखील त्यांच्यामध्ये पती पत्नीचे नातेसंबंध कायम आहेत. गैरअर्जदार क्र.१ पासून अर्जदार क्र.१ हिला अर्जदार क्र.२ हा मुलगा झालेला आहे. विवाहानंतर अर्जदार व गैरअर्जदार हे सर्व कुटुंब एकत्र राहत होते.

**३.** अर्जदाराचे पुढे कथन की, लग्नानंतर गैरअर्जदार यांनी अर्जदार हिस काही महिने चांगले वागवले व नांदवले. त्यानंतर अर्जदार क्र.१ व तिच्या कुटूंबास समजले की गैरअर्जदार क्र.१ हा एम.जी.एम हॉस्पीटल, औरंगाबाद या ठिकाणी नोकरीस नाही. या विषयी तिने गैरअर्जदार क्र.१ व त्याच्या कुटूंबास विचारले असता त्यांनी तिला शिवीगाळ व मारहाण करण्यास सुरुवात केली. सदर घटना अर्जदार क्र.१ हिने तिच्या माहेरी तिच्या आई वडीलांना सांगितली व तिच्या आई-वडीलांनी मुलीचा संसार होण्यासाठी गैरअर्जदार यांनी केलेली फसवणूक विसरुन पुढे संसार करण्यासाठी सांगितले. त्यानंतर गैरअर्जदारांनी अर्जदार हिस चांगले नांदविले. परंतु अर्जदार हिस गैरअर्जदार क्र.१ ह्याचे परस्त्रीसोबत अनैतिक संबंध असल्याचे कळाले. त्यानंतर अर्जदार क्र.१ हिने त्याबाबत गैरअर्जदार क्र.१ ह्यास विचारले असता त्याने व त्याच्या कुटूंबाने अर्जदार हीस मारहाण करण्यास सुरुवात केली. गैरअर्जदार क्र.४ व ५ यांनी ही रांजणगांव दांडगा येथून येउन अर्जदार क्र.१ हीस मारहाण केली व अर्जदार हीस घरातुन हाकलुन दिले. त्यानंतर अर्जदार क्र.१ हिने सदर घटना तिच्या आई-वडीलांना सांगितली. अर्जदाराच्या आई-वडीलांनी गैरअर्जदारांच्या घरी जाउन त्यांची समजुत काढली व अर्जदार क्र.१ हीस त्या ठिकाणी संसार करण्यासाठी अर्जदार ही राहू लागली. त्यानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ पासुन हिस दिवस गेले.

४. अर्जदाराचे पुढे कथन की, तिला दिवस गेल्यानंतर देखील गैरअर्जदार क्र.१ हा परस्त्रीशी बोलतांना तिला दिसला. त्याबाबत तिने जाब विचारला असता गैरअर्जदाराने व तिच्या घरच्यांनी अर्जदारांला परत मारहाण केली. अर्जदाराच्या आई वडीलांच्या समजावण्यामुळे अर्जदार सर्व त्रास सहन करुन गैरअर्जदारासोबत राहत होती. परंतु गैरअर्जदारांनी तिला घरातून हकलून दिले. त्यानंतर अर्जदार क्र.१ हिने २ ते ३ वेळेस गैरअर्जदार क्र.१ कडे नांदविण्यास जाण्याबाबत अनेकवेळा प्रयत्नकेला परंतु त्याचा कुठलाही उपयोग झाला नाही. अर्जदार क्र.१ हिने दि.०७.०९.२०२३ रोजी सिध्दांत यास जन्म दिला. परंतु गैरअर्जदार हे मुलाला बघण्यासाठी आले नाही. त्यानंतर अर्जदार क्र.१ व तिच्या आई वडीलांन सोबत गैरअर्जदारांच्या घरी गेली परंतु गैरअर्जदारांनी त्यांना शिवीगाळ करुन हाकलुन लावले व तुझ्याशी आमचा संबंध नाही व आम्ही अविनाशचे दुसरे लग्न ऐश्वर्या सोबत लावून देणार आहोत असे सांगितले. त्यानंतर अर्जदार क्र.१ ही त्याच्या मुलाला घेउन त्याच्या आई–वडीलांनकडे राहू लागली.

५. अर्जदाराचे पुढे कथन की, दि.२१.११.२०२३ रोजी गैरअर्जदार क्र.१ याने ऐश्वर्या सोबत अतिथी मंगल कार्यालय, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे या ठिकाणी लग्न केले. त्यानंतर अर्जदार क्र.१ हिच्या वडीलांना कळाल्यास ते गैरअर्जदारांच्या घरी गेले असता त्यांनी अर्जदार क्र.१ व तिच्या आई वडीलांचा अपमान करुन तुला काय करायचे कर असे म्हणुन हाकलुन दिले. त्यानंतर अर्जदाराने गैरअर्जदार विरुध्द विविध तक्रारी दाखल केल्या. अर्जदार ही दि.२१.०२.२०२३ पासून गैरअर्जदार पासून वेगळी राहत आहे. तिला स्वतःचा व अर्जदार क्र.२ चा उदरनिर्वाह करण्यासाठी कुठलेही उत्पन्नाचे साधन नाही. याउलट गैरअर्जदारांनकडे मौजे रांजणगावं दांडगा येथे गट क्र.६८ मध्ये ९ हेक्टर ८३ आर क्षेत्र बागायती शेती असून वर्षाकाठी खर्च साठ ते सत्तर लाख रुपये उत्पन्न निघते. गैरअर्जदार क्र.०१ हा इतर मासिक उत्पनातून मासिक१ ते २ लाख रुपये मिळते.तसेच गैरअर्जदार यास स्वतःचे मालकीचे मोठे घर आहे व त्यातील चार खोल्या भाडयाने दिलेल्या आहे, त्याचे प्रत्येकी रु.५,०००/– रुपये प्रतीमहा भाडे गैरअर्जदारांना मिळते, गैरअर्जदारांची आर्थिक परिसिथती चांगली असल्यामुळे ते अर्जदारांना पोटगी देण्यासाठी समर्थ आहेत. त्यामुळे अर्जदाराने त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

६. अर्जदार क्र.१ ते ४ यांनी नि.१२ खाली म्हणणे दाखल करुन अर्जदार क्र.१ ही त्याची पत्नी असल्याचे मान्य केले आहे. गैरअर्जदाराने त्यांचा विवाह दिनांक १७.०४.२०२२ रोजी झाला आहे हे मान्य केले आहे. तसेच सदर लग्नसंबंधातून त्यांना सिध्दांत नावाचा मुलगा आहे हे मान्य केले आहे. परंतू अर्जदार यांनी खोटे व बनावट कथने करुन अर्ज दाखल केल्याची तसेच कोणतीही कायदेशीर कारणे नसतांना प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याचे म्हटले आहे. वास्तविक पाहता अर्जदार क्र.१ हीने सुरुवाती पासूनच गैरअर्जदारांनकडे व्यवसिथत नांदली

नाही ती नेहमी तिच्या आई वडींलांना बोलत असे. अर्जदार क्र.१ ही घरातील कामे करत नसे व तिला काही घरातील कामे सांगितली की, मुद्दाम दुर्लक्ष करणे, गैरअर्जदार क्र.१ व २ यांना शिवीगाळ करुन त्यांचा अपमान व मानसिक त्रास देत असे व त्यांचे काहीएक ऐकत नसे. गैरअर्जदारक्र.१ हा अर्जदाराच्या मनासारखा वागला नाही तर तिने हातावर ब्लेड मारुन जखमा केलेल्या आहेत, व विहिरीत उडी मारेन अशी ती सतत धमकी देत असत. अर्जदार क्र.१ हीने अनेकवेळा काही कारण नसतांना सुध्दा घरात फाशी घेण्याचा प्रयत्न केला आहे. गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या आई–वडीलांना तिच्या या वागण्याबद्दल सांगितले असता त्यांनी सुध्दा तिची बाजू घेउन गैरअर्जदारांना शिवीगाळ केली. गैरअर्जदारांनी अर्जदार व तिचे आई वडील व दोन्ही भाउ यांच्या विरुध्द पाचोड पोलिस स्टेशन येथे वेळोवेळी तक्रारी केलेल्या आहेत.

७. गैरअर्जदारानी पुढे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा कामानिमित्त गेवराई येथे गेला असता अर्जदार व तिच्या आई वडीलांनी गैरअर्जदाराच्या आईसोबत येउन भांडण केले व शिवीगाळ सुध्दा केला. तेव्हा गैरअर्जदार क्र.१ हा आल्यानंतर त्याने अर्जदारास समजावण्याचा प्रयत्न केला असता ति म्हणाली की मला तुझ्या सोबत संसार करायचा नाही तेंव्हा पासून अर्जदार क्र.१ ही विनाकारण माहेरी राहत आहे. अर्जदार क्र.१ला हिला गैरअर्जदार क्र.१ याने असा कुठलाही मानसिक, शारिरिक, आर्थिक त्रास दिलेला नाही. अर्जदाराने केवळ गैरअर्जदाराला मानसिक त्रास देण्याच्या हेतूने ही केस दाखल केली आहे. गैरअर्जदार क्र.१ हा मोल मजूरी करतो. त्याला कधी काम मिळते कधी नाही. पण अर्जदार क्र.१ ही इतरांच्या शेतात कामधंदा करते व त्यापासून तिला १० ते १५ हजार रुपये उत्पन्न मिळते. अर्जदार क्र.१ ही स्वतःचा व मुलाचा सांभाळ करण्यास सक्षम आहे. त्यामुळे त्यांनी अर्जदाराचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

८. अर्जदार व गैरअर्जदारांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही विद्वान वकिलांनी त्यांच्या अर्ज व लेखी म्हणण्यामधील मजकुराची पुनरावृत्ती केली.

९. अर्जदार यांचा अर्ज, गैरअर्जदार यांनी दाखल केलेले म्हणणे व कागदपत्रे विचारात घेता माझ्यासमक्ष खालील मुद्दे निष्कर्षासाठी उपस्थित झालेले असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसासह देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शी गैरअर्जदार यांच्याकडून अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार झाला असे शाबीत होते काय ? | **होकारार्थी** |
| २. | अर्जदार ही तिने मागणी केल्याप्रमाणे अंतरीम | |

| | | |
|---|---|---|
| | पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | **अंशतः होकारार्थी** |
| ३. | आदेश काय ? | **अंतरीम पोटगी अंशतः मंजुर करण्यात येते.** |

**''<u>कारणमिमांसा</u>''**

**<u>मुद्दे क्र.१ व २ करीता.</u>**

**१०.** मुद्दे क्र.१ व २ हे एकमेकांशी संलग्न असल्याने विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांचे विश्लेषण एकत्र करण्यात येत आहे.

**११.** गैरअर्जदार यांनी अर्जदार यांचे नातेसंबंध मान्य केले असल्याने अर्जदार क्र.०१ ही गैरअर्जदार क्र.१ यांची पत्नी व अर्जदार क्र.२ हा त्यांचा मुलगा असल्याचे शाबीत होते.लग्नानंतर काहीदिवस अर्जदार क्र.१ ही सासरी नांदण्यास गेली होती ही बाब देखील दोन्ही पक्षांना मान्य आहे. त्यामूळे त्यांच्यामध्ये कौटूंबिक संबंध असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते. अर्जदार हिने तिच्या अर्जामध्ये गैरअर्जदारांकडून होणा–या शारिरीक व मानसिक त्रासाबद्दल इत्यंभुत विवेचना केली आहे. उलटपक्षी गैरअर्जदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये अर्जदाराची सर्व कथने नाकारली आहेत. अर्जदार क्र.१ ही तिच्या माहेरी राहत असल्याचे गैरअर्जदारास मान्य आहे. सदरील तारखेपासून अर्जदाराच्या पालपोषणाकरिता गैरअर्जदाराने काही जबाबदारी उचलली आहे किंवा नाही याचे देखील कथन गैरअर्जदाराच्या लेखी म्हणण्यात दिसून येत नाही. त्यामुळे अर्जातील व गैरअर्जदाराच्या लेखी म्हणण्यातील कथनांचा विचार करता प्रथमदर्शनी गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र.१ हिचा मानसिक, आर्थिक व कौटूंबिक हिंसाचार केल्याचे दिसुन येते.

**१२.** अर्जदार क्र.०१ हीने गैरअर्जदार यांचेकडुन दरमहा रु. १०,०००/–अंतरीम पोटगीची मागणी केली आहे. अर्जदार क्र.०१ हिच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार क्र.०१ याच्याकडे मौजे रांजणगांव दांडगा, ता.पैठण, जि.औरंगाबाद येथे गट नं.६८ मध्ये ९ हेक्टर ८३ आर बागायती जमीन आहे. अर्जदाराने सदर गटाचा सातबारा उतारा न्यायालयात दाखल केला आहे. सदर उताऱ्याचे अवलोकन केले असता गैरअर्जदारांच्या नावे सामाईकपणे ९ हेक्टर ८३ आर जमीन दिसून येते. सदर जमीनीत गैरअर्जदार तूर व कापसाच्या पिकाचे उत्पन्न घेत असल्याचे दिसून येते. त्यामुळे जरी गैरअर्जदार क्र.०१ च्या एकटयाच्या नावे जमीन मिळकत नसली तरी त्याला वरील जमिनीतून उत्पन्न मिळत नाही असे प्रथमदर्शनी म्हणता येणार नाही. अर्जदार ही तिच्या आई वडिलांकडे नायगांव गावी राहत असल्याचे तिला मान्य आहे. त्यामुळे गाव पातळीवर लागणारा दैनंदिन खर्च तसेच अर्जदार क्र.२ चे वय लक्षात घेता अर्जदाराला महिना सहा हजार रुपये इतका खर्च कमीत कमी अपेक्षित आहे. पत्नी व मुलाचा सांभाळ करणे हे गैरअर्जदाराचे कर्तव्य आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदार माहेरी गेल्यापासून तिला आर्थिक

साहाय्य केल्याबाबत म्हटले नाही किंवा तसा कोणताही प्रथमदर्शी पुरावा नाही. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ यांची पत्नी व अर्जदार क्र.०२ हा त्यांचा मुलगा आहे ही बाब अमान्य करता येणार नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ चे संभाव्य उत्पन्न व अर्जदारांचे राहणीमान व गरजा विचारात घेता अर्जदार क्र.०१ व २ यांना एकत्रीतरित्या दरमहा रु.६,०००/– रुपये अंतरीम पोटगी देणे योग्य व उचित होईल.

**१३.** वर विवेचन केल्याप्रमाणे गैरअर्जदार यांनी प्रथमदर्शनी अर्जदार यांचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे दिसुन आल्याने व गैरअर्जदार क्र.१ याचे संभाव्य उत्पन्न विचारात घेता मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी व मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवत आहे. तसेच मुद्दा क्रमांक ३ साठी खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.०१ व २ यांना एकत्रीतरित्या दरमहा रुपये ६,०००/– अर्ज दाखल तारखेपासून अंतरीम पोटगी वजा अनुतोष कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ प्रमाणे द्यावी.

२. आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना मोफत द्यावी.

Digitally signed by KANAKDANDE SHRIHARI
Date: 2025.01.31 04:17:26 +0530

**(एस.आर.कनकदंडे)**

दिनांक– ३१.०१.२०२५

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,क.स्तर,
पैठण, जि.औरंगाबाद.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, या पी. डी. एफ. करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द–नि–शब्द हे मूळ आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | कोमल विजयसिंग बायस |
| न्यायालयाचे नाव | : | न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, पैठण. |
| आदेशाची तारीख | : | ३१.०१.२०२५ |
| आदेशावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ३१.०१.२०२५ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : | ३१.०१.२०२५ |